## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २८ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागातर्फे दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'माणुसकीच्या जाणीवा' हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. हा उपक्रम सन २०२२ पासून सातत्याने राबविला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना दृढ करणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असून यावर्षी या उपक्रमाचे चौथे वर्ष होते. यावर्षी हा उपक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव, जि. जळगाव येथे आयोजित करण्यात आला.

सकाळी १० वाजता अन्नपूर्णेची पूजा करून आणि मनाचे श्लोक सामुहिक रित्या ग्रहण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या वेळी शिक्षणशास्त्र विभागाचे विद्यार्थी गणवेशात व ओळखपत्रांसह उपक्रम स्थळी उपस्थित होते. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी रुग्णालयातील गरजू रुग्ण, त्यांच्या नातेवाइकांना आणि इतर हितगुज व्यक्तींना अन्नपाकिटांचे वितरण केले. एका वेळच्या जेवणाची चिंता दूर झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले. वितरणावेळी गोंधळ होणार नाही याची काळजी घेत विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम पार पाडले. या अन्नदान उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सहानुभूती, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि संघभावना विकसित होण्यास मदत झाल्याचे मार्गदर्शकांनी सांगितले. एखाद्या गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर आलेले हास्य हेच आमच्या विद्यार्थ्यांच्या सहभागाचे सर्वात मोठे यश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सदर उपक्रमाची संकल्पना डॉ. मनीषा इंदाणी यांची होती. तर नियोजन व मार्गदर्शन डॉ. संतोष खिराडे यांनी केले. उपक्रम स्थळी मार्गदर्शक म्हणून डॉ. रणजित पारधे आणि डॉ. स्वाती तायडे हे उपस्थित होते. कार्यक्रम स्थळी प्रत्यक्ष नियोजन आणि शिस्तपालन हे काम श्री संदीप वाघ आणि श्री योगेश कोरडेवाड यांनी बघितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी जयेश पाटील, विवेक भावसार तसेच विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. 'चला, एक पाऊल माणुसकीकडे' या घोषवाक्याने सजलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान अधिक दृढ झाले असून पुढील काळातही हा उपक्रम सातत्याने राबविण्याचा विभागाचा मानस आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २८ : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त विद्यापीठातील विचारधारा प्रशाळे अंतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्रच्या वतीने विचारधारा प्रशाळेच्या सभागृहातमहात्मा फुलेंच्या सत्यशोधकी विचारांची प्रासंगिकता या विषयावरसमूह चर्चेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे,तर विचार मंचावर महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. पवित्रा पाटील, स्वामी विवेकानंद अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. अतुल बारेकर तसेच विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महात्मा फुलेंच्या सत्यशोधकी विचारांची प्रासंगिकता या विषयावर आपआपली मते मांडली. यात संशोधक विद्यार्थी महेश सूर्यवंशी याने सांगितले की, १८६८ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडलेल्या असतांना येथील अस्पृश्य समाजाला पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत होता त्यावेळी महात्मा फुलेंनी त्यांची विहीर अस्पृश्य समाजाला उपलब्ध करून दिली होती. इतकी भीषण जातीयता त्यावेळी होती त्याप्रमाणेच आजच्या काळातही राजस्थान मध्ये एका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याला शाळेतील पाणवठ्यातून पाणी पिल्याने तेथील शिक्षकाने जातीय द्वेषातून त्याला गंभीर स्वरुपात मारले अशा घटना आजच्या काळातही घडलेल्या आहेत. त्यानंतर डॉ. सुदर्शन भवरे हेम्हणाले की, एका विशिष्ट्य समाजाची मक्तेदारी मोडीत काढण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केलेले आहे. सर्वांना शिक्षण मिळावे हा महात्मा फुलेंचा मूलतः हेतू होता. व इथल्या भ्रमिष्ट धर्मव्यवस्थेवर प्रहार करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.डॉ. प्रीती सोनी यांनी महिलांच्या उन्नतीच्या मागे सर्वात मोठ कार्य म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे असल्याचे नमूद केले. त्याचसोबत प्रा. कृष्णा संदानशिव यांनी माणसाचा सत्य हाच एक धर्म असावा ज्योती म्हणे याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी महिला शिक्षण, अस्पृश्यांसाठी पाण्याचा हौद अशा अनेक कार्यांतून समाजात क्रांती घडवून आणली.

महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्या विभाग प्रमुख डॉ. पवित्रा पाटील यांनी सांगितले की, समाजामध्ये समानता असावी. महात्मा ज्योतिबा फुले या क्रांतीसूर्यामुळे खऱ्या अर्थाने मी वर्तमान स्थितीतील या पदावर कार्यरत आहे असे बोलून त्यांनी फुलेंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विचारधारा प्रशाळेचे अध्यक्ष प्रा. डॉ. म. सु. पगारे हे सदर समूह चर्चेच्या मागील हेतू सांगतांना म्हणाले की, सखोल निष्कर्षा पर्यंत पोहोचण्यासाठी समूह चर्चा आयोजित केल्या जात असतात. या माध्यमातून सत्यान्वेषी विचार मांडतांना प्रज्ञेचा प्रवास होत असतो. महात्मा फुलेंचे संपूर्ण साहित्य अभ्यासतांना आपण हे लक्षात घेतले

पाहिजे की, महात्मा फुले यांनी ब्राम्हण समाजाला विरोध केलेला नसून ब्राम्हणी प्रवृत्तीला विरोध केलेला आहे. श्रेष्ठ आणि कनिष्ठ ह्या दऱ्या निर्माण करणाऱ्या ब्राम्हण्यग्रस्त असलेल्या प्रवृत्तीला त्यांचा विरोध होता. याच सोबत प्रकर्षाने आपण हे ही समजून घेतले पाहिजे की, महात्मा फुलेंनी फक्त दलित, अस्पृश्य समाजासाठीच कार्य केलेले नसून त्यांनी ब्राम्हण समाजातील स्त्रीयांना शिक्षणाची दारे उघडली तसेच अनिष्ठ रूढींना देखील विरोध केला. विधवा ब्राम्हण महिलेंच्या केशवपणालात्यांनी विरोध केला. बहुआयामी असे महात्मा फुलेंचे कार्य आहे. त्यांनी केलेला थेट प्रश्न हा महत्वाचा आहे. श्रेष्ठ व कनिष्ठपणा जात, धर्मावर आधारित नसावी. गुणसंपन्नता, शीलसंपन्नता, सदाचरण तसेच समाजसेवेची तळमळ महात्मा फुलेंमध्ये होती. त्यामुळे आजच्या दिवशी त्यांना अभिवादन करतांना आपण स्वतःला आनंदी, समाधानी व धन्य मानले पाहिजे. असे यावेळी प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात यांनी केले तर आभार प्रदर्शन जितेंद्र नाईक याने केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २८ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता